# सन २०२२ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका) निवडणूक

**श्री. अतुल सुभाष टिके ,** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत.

ई मेल- atulstike@gmail.com,संपर्क – ९४२२२५६४९७

---

**प्रस्तावना**

लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांकरवी चालवलेली शासन पद्धती म्हणजेच लोकशाही ही अगदीच रुळलेली' रुजलेली व्याख्या आपल्या सर्वांगात भिनली आहे. केवळ कायदेमंडळ कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ म्हणजे राज्यशास्त्र नव्हे राज्यशास्त्राचा सर्वांगाने विचार करत असताना नागरिक म्हणून आपल्या मानवी गरजांची पूर्तता करण्याचे काम स्थानिक शासन संस्था यांच्या माध्यमातून केले जाते मग ती गावपातळीवरील ग्रामपंचायत असो पंचायत समिती असो अथवा जिल्हा परिषद किंवा नागरी भागाचा विचार करता नगरपरिषद ,नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका अशा नागरी स्थानिक संस्थांच्या माध्यमातून आपल्या जगण्याला अर्थ येत असतो. स्थानिक पातळीवर आपल्या प्रत्येक गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष देणारी संस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था यालाच सर्वसाधारणपणे पंचायतराज व्यवस्था असे संबोधले जाते भारतीय लोकशाहीच्या यश - अपयशाची चर्चा करत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांची उपयुक्तता त्याची कार्यप्रणाली, त्याचे महत्त्व, या सर्व गोष्टींचा अंतर्मुख होऊन विचार करणे आवश्यक आहे.नागरिक म्हणून आपल्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवून आपल्या जगण्याला आकार देण्याचे काम याच स्थानिक स्वराज्य संस्था करतात.

लोककल्याणकारी राज्याची प्रस्थापना करत असताना प्रक्रियेच्या माध्यमातून राष्ट्रीय सामाजिकीकरण घडून यावे व सहभाग वाढावा या उद्देशाने भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला ज्याची वयाची १८ वर्षे पूर्ण झाले आहेत असे नागरिक मतदानाच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार बहाल केला आहे. संविधानाच्या नव्या भागात स्थानिक शासन यंत्रणेची तरतूद करण्यात आली आहे या माध्यमातून शहरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था असे वर्गीकरण करून अनुक्रमे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ७३ वी घटनादुरुस्ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ७४ वी घटनादुरुस्ती करून या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक अधिकार बहाल करून स्वायत्तता देण्यात आली आहे स्थानिक शासन पद्धती सक्षम होणे हे लोकशाहीच्या यशाचे द्योतक आहे. निवडणुकीच्या माध्यमातून चांगले लोकप्रतिनिधी देऊन स्थानिक शासन यंत्रणा बळकट करण्याचे सामर्थ्य प्रत्येक भारतीय नागरिकांना दिले गेले आहे.

**महाराष्ट्रातील महानगरपालिका**

महाराष्ट्र राज्यात ६ प्रशासकीय विभागात एकूण २७ महानगरपालिका अस्तित्वात असून, त्याचे विभागवार विवरण पुढीलप्रमाणे -

**कोकण विभाग (९)** बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण- डोंबिवली, मीरा -भाईंदर , पनवेल,उल्हासनगर,भिवंडी -निजामपूर

**पुणे विभाग (५)** पुणे, पिंपरी चिंचवड,कोल्हापूर सोलापूर संगली- मिरज- कुपवाड

**औरंगाबाद विभाग (४)** औरंगाबाद, लातूर, परभणी, नांदेड- वाघाळा

**अमरावतीविभाग(२)** अमरावती, अकोला

**नागपूर विभाग (२)** नागपूर ,चंद्रपूर

**नाशिक विभाग (५)** नाशिक, जळगाव, अहमदनगर, धुळे, मालेगाव

सन-२०२२ मध्ये वरीलपैको १७ महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत यामध्ये प्रामुख्याने बृहन्मुंबई, ठाणे,नागपूर पुणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड या महानगरांसोबतच उल्हासनगर, वसई-विरार, पिंपरी चिंचवड, लातूर, कोल्हापूर, सोलापूर, परभणी, नादेड-वाघाळा,, मीरा- भाईंदर या महत्वाच्या महानगरपालिकेंचा समावेश आहेत सदर संशोधन लेखातून प्रस्तुत महानगरपालिकांतील सध्याचे पक्षीय बलाबल व सध्याची राजकीय परिस्थिती यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करत आहे.

**बृहन्मुंबई-** मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी म्हणून आपणांस सुपरिचित आहे. इतिहास बघितला तर मुंबईचे आकर्षण सर्वांनाच आहे या मुंबईतूनच संयुक्त महाराष्ट्राची रक्तरंजित क्रांती घडून आली व १०५ हुतात्म्यांच्या आहुतीने मुंबई सदैव महाराष्ट्राची झाली मुंबईचे देशातील स्थान आनेक बाबतीत वैविध्यपूर्ण स्वरूपाचे आहे. मुंबईला सामाजिक ,राजकीय , ऐतिहासिक वारसा लाभला आहे. मुंबईचा विचार देशात स्विकारला जातो. हादेखील इतिहासच आहे या मुंबईचा कारभार पाहणारी बृहन्मुंबई महानगरपालिका अनेक बाबतीत ऐतिहासिक आहे अगदी इमारतीपासून ते खजिन्यापर्यंत समृध्द स्वरूपाचे आहे. ओपन मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा देशातील नऊ घटकराज्यांच्या अर्थसंकल्प बरोबरीचा असतो म्हणूनच तर उत्तरप्रदेशातील बहुजन समाज पक्ष व समाजवादी पक्षाला मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेचे

आकर्षण आहे. मागील सन २०१७ च्या निवडणूकीत सर्वच स्वतंत्रपणे निवडणूक लढवली यात मराठी आस्मितेच्या आधारे शिवसेना पक्षाने सर्वाधिक ९७ जागा प्राप्त केल्या. त्याखालोखाल राज्यातील सत्तेचा वापर करून भारतीय जनता पक्षाने ८२ जागा प्राप्त करून आपले महत्व अधोरेखित केले काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आघाडी करून अनुक्रमे २९ व ८ जागा मिळवल्या उत्तर भारतीय मतांचे ध्रुवीकरण करुन समाजवादी पक्षाने ६ जागा मिळवल्या तसेच मराठी अस्मितेचा मुद्दा घेऊन लढणा-या महाराष्ट्र नवनिर्मान सेनेने अवघी १ जागा मिळवली.तसेच मुस्लिम मतांच्या प्रभावाने एम.आय एम पक्षाने २ जागा प्राप्त केल्या अनेक वर्षे शिवसेना पक्षाने मराठी अस्मितेचा मुद्दा तेवत ठेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेची सत्ता कायम ठेवली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराचे भांडवल करुन सर्वच राजकीय पक्ष आपले राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सन २०१९ पासून महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असून भाजपा प्रबळ व प्रभावी विरोधकांच्या भूमिकेतून आपले स्थान बळकट करण्याचा प्रयत्न करत आहे.. स्थायी समितीचे सभापती श्री यशवंत जाधव यांच्या निवासस्थान व कार्यालयावर प्राप्तीकर विभागाच्या पडलेल्या धाडीतून भाजपा ने बरेच काही निर्देशीत केले आहे. शिवसेना आपल्या राज्यातील सत्तेचा प्रभावाने महानगरपालिका ताब्यात ठेवण्याचा निश्चीतच प्रयत्न करणार मात्र तिन्ही पक्षांची आघाडी होते होते स्वतंत्रपणे लढणार यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. राज ठाकरे नव्या उमेदीने आपला मराठी अस्मितेचा मुद्दा, तसेचमहानगरपालिकतील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुढे करून रणांगणात उतरणार हे नक्की, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या रुपाने मुंबईची सर्व नस माहित असणारे तसेच शिवसेनेला भिडणारे नेतृत्व तसेच ईडी, प्राप्तीकर विभाग, सी.बी.आय यासारख्या केंद्रीय यंत्रणाचे पाठबळ भाजपा कडे आहे.५ पैकी ४ घटकराज्यात बहुमताने सत्तेवर आल्याने या पक्षाचा आत्म विश्वास दुणावला आहे बाकीचे पक्ष आपल्या अस्मितांचा वापर करून आपले राजकीय बस्तान बसवण्याचा प्रयत्न करत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक सत्ताधारी शिवसेना, भाजपा, मनसे, या पक्षांसाठी राजकीय धर्मयुद्ध होऊन बसली आहे

**पुणे-**महाराष्ट्रीची शैक्षणिक राजधानी विद्येचे माहेरघर ,मेट्रो शहर पुणे महानगरपालिकेची निवडणूक यावर्षीच होणार आहे. मागील निवडणूकीत १६४ सदस्यीय सभागृहात राज्यातील सत्तेचा वापर करून भाजपा ने ९९ जागा प्राप्त करुन सत्ता प्राप्त केली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ४२ काँग्रेस १० शिवसेना १० मनसे २ एम.आय.एम १ असे सदस्यीय बलाबल होते. यावर्षी राजकीय समीकरणे बदलली असून विकासकामाच्या माध्यमातून भाजपा तसेच राज्यातील सत्तेच्या प्रभावातून मा. पालकमंत्री अजित पवार सत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करत आहेत. परवाच प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते पुणे मेट्रो रेल्वे सेवेचे उद्घाटन करून भाजपाने निवडणूकीचे रणशिंग फुंकले असून पालकमंत्री श्री.अजित पवार यांनी राज्यातील तिजोरीतून पुणे शहरासाठी निधीची खैरात करुन आपली एक विकासात्मक प्रतिमा उभी केली आहे. महाविकास आघाडीचा प्रयोग करून निवडणूकीस एकदिलाने सामोरे गेल्यास अजित पवारांच्या प्रयत्नांना यश येईल असे वाटते मनसेने आपला वर्धापन दिन पुण्यात साजरा करून योग्य तो संदेश विरोधकांना दिला आहे असेच म्हणावे लागेल. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रकांत पाटील पुण्याच्या कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात यातूनच त्यांचीही प्रतिष्ठा पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी पणाला लागली आहे असेच म्हणावे लागेल.

**पिंपरी चिंचवड-** आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका अशी ओळख असलेल्या तसेच उद्योगनगरी म्हणून सर्व महाराष्ट्राला सुपरिचीत असलेल्या पिंपरी -चिंचवड महानगरपालिच्या १३२ सदस्यीय सभागृहात भाजप ७७
राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ३६ शिवसेनेचे ९ मनसेचा १ असे पक्षीय बलाबल अलून गेल्या भाजपाने राज्यातील सत्तेच्या प्रभावाने भोसरीचे आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून भाजपने सत्ता काबीज केली. या महानगरपालिकेचा समावेश मावळ लोकसभा मतदारसंघात होतो आणि येथूनच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा एक लाखाच्या फरकाने झालेला पराभव ना. अजित पवारांच्या जिव्हारी लागला असून त्यांनी सन २०१९ नंतर राज्याची सत्ता हाती घेतल्याबरोबरच पुणे शहरासोबतच पिंपरी-चिंचवड शहरावर आपले विशेष लक्ष केंद्रित केले असून बेरजेच्या राजकारणावर अधिक भर देऊन पिंपरी - चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न अजित पवार यांच्या माध्यमातून चालला आहे.पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या सत्तेच्या माध्यमातून पुत्र पार्थ पवार यांचा मावळ लोकसभेसाठी मार्ग सुकर करण्याचेदेखील प्रयत्न श्री अजित पवार यांचे निश्चितच असणार आहेत.

**नाशिक-** महाराष्ट्राची देवभूमी अशी ओळख असलेले शहर म्हणून नाशिकची ओळख आहे. माय गोदावरीचे उगमस्थान, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मभूमी अशी वैशिष्ट्यपूर्ण ओळख लाभलेले नाशिक शहर भौगोलिकदृष्ट्या मुंबईच्या नजीकच असल्याने शिवसेना मुंबई, ठाणे नंतर नाशिकमध्ये शिवसेना रुजली व वाढली गत पंचवार्षिक निवडणुकीत राज्यातील सत्तेच्या प्रभावाने राज ठाकरे यांचे नाशिक प्रतिरूप नाकारून जनतेने भाजपाला स्वीकारले व १२३ सदस्यीय सभागृहात भाजपा ने ६६ जागा प्राप्त केल्या तत्कालीन मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी विकास कामांच्या बाबतीत नाशिक शहर दत्तक घेण्याची घोषणा करून लोकांना प्रभावित केले, तसेच नाशिक शहराचा समावेश स्मार्ट सिटी योजनेत करून सत्ता काबीज केली शिवसेनेला ३५

जागा प्राप्त झालेल्या राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना बेहिशेबी मालमत्तेच्या संदर्भात तुरुंगवास झाल्याने राष्ट्रवादी सेनापती अभावी केवळ ६ जागा प्राप्त करू शकली, तर कॉंग्रेसला ६ जागा प्राप्त झालेल्या बहुउद्देशीय नाशिक प्रतिरूप जनतेने नाकारले व केवळ ५ जागांचे दान राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला टाकले तसेच ५ अपक्षही सभागृहात प्रतिनिधित्व करत आहेत सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार केला तर महाविकास आघाडीचा प्रयोग केला तरच नाशिकमध्ये सत्ताधारी भाजपा समोर आव्हान उभे करता येईल अशी परिस्थिती आहे. प्रस्तावित महाविकास आघाडीचे नेतृत्व कोण करेल ? यावर नाशिक महानगरपालिकेची निवडणूक महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकदिलाने लढणार की स्वतंत्र हे अवलंबून आहे.

**औरंगाबाद-** राज्याच्या पर्यटनाची राजधानी, मराठवाड्याची राजधानी, ५२ दरवाजांचे शहर अशी नानाविध बिरुदे लाभलेले औरंगाबाद शहर या शहराचा राजकीयदृष्ट्या विचार केल्यास धार्मिक ध्रुवीकरण व नामांतराच्या चळवाळीनंतर शिवसेना शहरात प्रभावी बनली आहे सन १९९० च्या दशकापासून या शहरांवर शिवसेनेचेच वर्चस्व राहिले आहे, मात्र एम .आय. एम पक्षाच्या स्थापनेनंतर मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण होऊन गेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत १०९ सदस्यीय सभागृहात सेनेचे २९ एम .आय .एम पक्षाचे २५ भाजपाचे २३ कॉंग्रेस १० राष्ट्रवादी २ अपक्ष 19 असे पक्षीय बलाबल होते. तुलनात्मक दृष्टीने विचार केल्यास या एम.आय.एम व भाजपा या दोन्ही पक्षांचे कडवे आव्हान प्रस्थापित शिवसेनेसमोर निर्माण झाले आहे यावर्षी होऊ घातलेल्या निवडणुकीत एम .आय. एम खासदार श्री इम्तियाल जलील, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड तसेच केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या रुपाने सत्ताधारी शिवसेनेसमोर निश्चितच आव्हान उभे राहिले असून त्याला पर्याय म्हणजे महा विकास आघाडीच्या प्रयोगातून निवडणूक लढवणे हाच पर्याय सत्ताधारी शिवसेनेसमोर उपलब्ध राहिला आहे. दरवर्षीप्रमाणे औरंगाबाद की संभाजीनगर ? असा नामांतराचा विवाद निर्माण न करता आपण केलेल्या विकासकामांच्या जोरावर आपली विकासात्मक प्रतिमा उभा करून राज्यातील सत्तेचा वापर करून तसेच महाविकास आघाडीच्या प्रयोगातून सत्ताधारी शिवसेनेला निवडणूक लढवणे अपरिहार्य आहे.

**ठाणे-** मुंबईपाठोपाठ ठाणे हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे सन १९९० च्या दशकापासून ठाण्यावर शिवसेनेचे हे एकहाती वर्चस्व राहिले असून स्व आनंद दिघे यांनी सेनेची पाळेमुळे सर्वसामान्यत घट्ट रुजवली आहेत मागील पंचवार्षिक निवडणुकीत १३१ सदस्यीय सभागृहात सेनेचे ६७ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ३४ भाजपाचे २३ कॉंग्रेस ३ एम आय एम २ तसेच अपक्ष यांचा समावेश होता यावर्षी होऊ घातलेल्या निवडणुकीत ठाण्याचे पालकमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकासकामांच्या माध्यमातून शिवसेना निवडणुकीला सामोरे जात असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षही गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या माध्यमातून आपले राजकीय अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न निश्चित करेल यात शंका नाही, ना.एकनाथ शिंदे ना. जितेंद्र आव्हाड यांच्यातील अंतर्गत कुरबुरी प्रसारमाध्यमातून समोर येत असतात मात्र महाविकासआघाडी म्हणून एकदिलाने एकत्र स्वरूपात निवडणूक लढवण्यास ठाण्याचा गड शिवसेनेच्या ताब्यात राहण्यात कोणतीही अडचण राहणार नाही.

**नवी मुंबई-** महाराष्ट्रातील अत्यंत नियोजनबद्ध रीतीने वसवलेले सुसज्ज शहर म्हणजे नवी मुंबई हे शहर महानगर मुंबईवरील नागरी ताण कमी करण्याच्या दृष्टिकोनातून बसवण्यात आले होते. या शहराच्या समृद्धीत पश्चिम महाराष्ट्रातून येऊन येथे स्थिर झालेल्या माथाडी कामगारांचे योगदान खूपच महत्त्वाचे आहे मागील पंचवार्षिक निवडणुकीत गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने १५९ सदस्य सभागृहातील १११ जागा प्राप्त करून स्पष्ट बहुमत मिळवले होते. कालांतराने सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षांतराचा लाटेत श्री गणेश नाईक यांनी राष्ट्रवादीचा त्याग करून भाजपाचे कमळ हाती घेतले सध्या महानगरपालिका राजकारणात राष्ट्रवादीचे खाते निरंक झाले आहे. त्याचबरोबर शिवसेना ३८ आणि कॉंग्रेस १० असे पक्षीय बलाबल नवी मुंबई महानगरपालिकेत आहे. यावर्षी होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रयोग नव्या मुंबईत करून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष करतील यात शंका नाही भारतीय जनता पक्षात गणेश नाईकांना त्यांच्याच पक्षातील बेलापूरच्या आमदार श्रीमती मंदा म्हात्रे सतत विरोध करताना दिसतात ही अंतर्गत बंडाळी मिटवून भाजपाने एक दिलाने निवडणूक लढवाली तरच भाजपाला सत्तेचा सोपान गाठता येईल. अन्यथा शिवसेनेच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीला नवी मुंबई महानगरपालिकेत सोन्याचे दिवस येतील यात शंका नाही.

**नागपूर** - महाराष्ट्राची उपराजधानी असलेले शहर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असणारे शहर, रिपब्लिकन चळवळ रुजलेले शहर अशी वैविध्यपूर्ण ओळख या नागपूर शहराला लाभली आहे. या शहराच्या राजकीय संस्कृतीची जडणघडण ही खूपच वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहे मागील महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत १४७ सदस्यीय सभागृहात भाजपाचे १०८ कॉंग्रेसचे २९ बहुजन समाज पक्षाचे २० असे पक्षीय बलाबल आहे आगामी निवडणुकीत देखील यामध्ये खूप मोठा फरक पडेल असे वाटत नाही कारण केंद्रीय परिवहन मंत्री नितिन गडकरी तसेच माजी मुख्यमंत्री व त सध्याचे विरोधी पक्षनेते श्री देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने भाजपाने नागपूर शहरात आपली विकासाची प्रतिमा उभी केली आहे मात्र कॉंग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीत तसेच नागपूर पदवीधर विधानपरिषदेच्या निवडणुकीत मिळविलेल्या यशाने त्यांचा आत्मविश्वास

दुणावला असून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री नाना पटोले नागपूरचे पालकमंत्री नितीन राऊत यांचा आक्रमक चेहरा पुढे करून निवडणुकीला सामोरे जाण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या माध्यमातून होऊ शकेल.

**कोल्हापूर** - पुरोगामी विचारांचे शहर कुस्तीगारांची पंढरी नैसर्गिक साधनसंपत्तीने सधन जिल्हा अशी ओळख लाभलेला कोल्हापूर जिल्हा व कोल्हापूर शहरात सामाजिक ,धार्मिक, राजकीय, आर्थिक, स्वरूपाचा समृद्ध वारसा लाभला आहे दोन्ही खासदार शिवसेनेचे विधानसभेचा विचार केल्यास प्राबल्य राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे व सहकारावर प्रभुत्व राष्ट्रवादीचे असा सर्वपक्षसमभाव येथील जनतेने स्वीकारला आहे मागील महानगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत ८१ सदस्यीय स्भागृहात काँग्रेस ३० -राष्ट्रवादी १४ शिवसेना ४ भाजपा १३ ताराराणी आघाडी १९ असे पक्षीय बलाबल होते. मागील निवडणूकीवेळी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रभावातून भारतीय जनता पक्षाने भरारी घेतली तसेच स्थानिक राजकारणात प्रभाव असलेल्या महाडिक कुटूंबियांना भाजपात घेऊन भाजप पक्ष शक्तिशाली बनवण्याचा प्रयत्न त्यांनी केला सध्याचे पालकमंत्री सतेज पाटील व ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी शिवसेनेला सोबत घेऊन महाविकास आघाडीच्या रूपाने निवडणूक लढविल्यास निश्चितच महाविकास आघाडी म्हणून फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही .भारतीय जनता पक्षाने महानगरपालिकेची सर्व धुरा चंद्रकांत पाटील यांच्या आदेशान्वये कोल्हापूरचे माजी खासदार प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष श्री धनंजय महाडिक यांच्याकडे सोपवली आहे त्यांचा सर्वसामान्य लोकांशी अविरत जनसंपर्क हा भाजपाच्या दृष्टीने जमेची बाजू आहे आता फक्त भाजप केंद्रीय सत्तेचा, योजनांचा वापर करून योजनांची माहिती सर्वसामान्य कोल्हापूरकरांचा पर्यंत कशी होते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**सोलापूर-** महाराष्ट्राची वस्त्रोद्योग ,विडी उद्योगाचे शहर बहुभाषिक , बहुसांस्कृतिक अशी या शहराची ओळख आहे हे शहर महाराष्ट्राला बहुभाषिकते प्रमाणेच येथील बहुरंगी राजकारणामुळे महाराष्ट्राला परिचित आहे येथील राजकारणावर माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या रूपाने नेहमीच काँग्रेस पक्षाचा वरचष्मा राहिला आहे त्यांच्यानंतर त्यांच्या कन्या आमदार प्रणिती शिंदे त्यांचा राजकीय वारसा पुढे चालवत आहेत मागील महानगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत राज्यातील सत्तेच्या प्रभावातूनच भाजपाने तत्कालीन पालकमंत्री ना. विजयकुमार देशमुख व सहकार पणन मंत्री ना.सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून १०२ सदस्यीय सभागृहात तब्बल ४९ अशा सर्वाधिक जागा प्राप्त करून सत्ता प्राप्त केली काँग्रेस पक्षाला १४ शिवसेनेला २१ एम आय एम ९ राष्ट्रवादीच्ला ४ बहुजन समाज पक्ष ४ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष १ असे पक्षीय बलाबल मागच्यावेळी महानगरपालिकेच्या राजकारणात होते मात्र सध्या राज्यातील बदलत्या समीकरणाचा प्रभाव येथील स्थानिक राजकारणावर पडला आहे सध्याचे पालकमंत्री श्री दत्तात्रय भरणे यांनी शिवसेना, काँग्रेस, एम .आय .एम या पक्षातील दिग्गज व प्रस्थापित नेत्यांना राष्ट्रवादीत प्रवेश देण्याचा धडाकाच लावला असून त्यातूनच महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र भाजपाला रोखायचे असेल तर महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवणे अधिक संयुक्तिक व सोयीस्कर होऊ शकेल.

**नांदेड – वाघाळा-** माय गोदावरीच्या पाण्याने समृद्ध झालेले शहर, ऐतिहासिक गुरुद्वाराचे स्थान तसेच मराठवाड्यातील सर्वात वेगाने विकसित होणारे शहर अशी नांदेड शहराची ओळख आहे या जिल्ह्याच्या तसेच शहराच्या राजकारणामध्ये नेहमीच आधी स्व. शंकरराव चव्हाण व त्यानंतर त्यांचे पुत्र माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या रूपाने काँग्रेस पक्षाचाच वरचष्मा कायम राहिला आहे त्यांनी मुख्यमंत्रीपदाच्या काळात केलेल्या नांदेडचा सर्वांगीण विकास येथील जनता अजूनही विसरलेले नाहीत व तथाकथित मोदी लाटेमध्ये भाजपाने जिल्ह्यात आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे मागील महानगरपालिकेच्या निवडणुकीत ८० सदस्यीय महानगरपालिका सभागृहात काँग्रेसने ७३ जागा प्राप्त करून निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले त्याचप्रमाणे शिवसेना १ भाजपा ६ असे पक्षीय बलाबल होते सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार केल्यास काँग्रेस पक्ष शहरात अधिक प्रभावी असल्याने माजी मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्यासाठी आग्रही असणार हे मात्र निश्चित आहे अशावेळी भाजपा खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्याच नेतृत्वाखाली निवडणूक लढवून आपले अस्तित्व राखण्याचा सत्ताधारी काँग्रेस पक्षाला शह देण्याचा प्रयत्न करेल, हिंगोली चे खासदार नांदेडचे रहिवासी असणारे हेमंत पाटील, नांदेड उत्तरचे आमदार आमदार बालाजी कल्याणकर यांचे नेतृत्वाखाली लढण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या माध्यमातून होऊ शकेल महाविकास आघाडीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांना आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावाच लागेल.

**लातूर** - मराठवाड्यातील प्रमुख व्यापारी बाजारपेठ असलेले लातूर शहर माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या रूपाने काँग्रेसचा बालेकिल्ला अशी लातूरची राजकीय ओळख मागील निवडणुकीत मात्र ही ओळख पुसली गेली राज्यातील सत्तेच्या प्रवाहात तत्कालीन पालकमंत्री श्री संभाजी पाटील - निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून ५० सदस्यीय महानगर पालिकेच्या सभागृहात भाजपाचे ३६ जागा प्राप्त करून स्पष्ट बहुमत प्राप्त केले प्रस्थापित काँग्रेसला १३ व वंचित बहुजन आघाडीला १ असे पक्षीय बलाबल सध्याचे आहे सध्याच्या बदलत्या राजकीय परिस्थितीचा विचार केल्यास पालकमंत्री अमित

देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून आपले गतवैभव पुन्हा प्राप्त करण्याचा प्रयत्न कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून होणार आहे येथे महाविकास आघाडी होईल की नाही याची शाश्वती आजच्या घडीला तरी देता येत नाही.

**परभणी**- जगात जर्मनी व भारतात परभणी असे बिरुद अभिमानाने मिरवणारा परभणी जिल्हा या जिल्ह्याच्या राजकारणावर प्रामुख्याने शिवसेना ,काँग्रेस ,व राष्ट्रवादी काँग्रेस यांचे प्राबल्य असून माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या रूपाने भाजपा आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे मागील महानगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत मोदी लाटेचा निकराने प्रतिकार करून महानगरपालिकेच्या ६० सदस्यीय सभागृहात काँग्रेस पक्षाने ३० जागा प्राप्त करत आपले सत्तास्थान अधिक बळकट केले आहेत त्याचप्रमाणे राष्ट्रवादी १७ भाजपा ८-शिवसेना ५ असे पक्षीय बलाबल आहे सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार केल्यास काँग्रेस पक्षाने स्थान निश्चितच बळकट म्हणावे,लागेल महाविकास आघाडीचा प्रयोग येथे होईल अशी शक्यता सध्या तरी दिसत नाही.

**वसई-विरार** - महाराष्ट्राची राजधानी मुंबईला भौगोलिकदृष्ट्या संलग्न असलेल्या वसई-विरार महानगरपालिकेत स्थानिक आमदार व बहुजन विकास आघाडीचे प्रमुख हितेंद्र ठाकूर यांचे एकहाती वर्चस्व राहिले आहे. ११५ सदस्यीय महानगर पालिकेच्या सभागृहात बहुजन विकास आघाडीचे,१०९ सदस्य असून शिवसेना ५ व भाजपा १ असे पक्षीय बलाबल आहे बहुजन विकास आघाडीने पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या शिवसेनेला राज्य शासनामध्ये पाठिंबा दिला आहे असे असले तरी हितेंद ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडी स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल हे मात्र निश्चितच आहे.

**उल्हासनगर-** ठाण्याला लागून असलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठी कापड बाजारपेठ असलेल्या उल्हासनगर शहरात सिंधी,व मारवाडी समाजाचे प्राबल्य आहे मागील निवडणुकीत राज्यातील सत्तेच्या प्रभावाने व कल्लानी कुटुंब याच्या प्रभावाने भाजपाने ७१ सदस्यीय सभागृहात ४० जागा प्राप्त करून सत्ता काबीज केली त्याप्रमाणेच शिवसेना २४ राष्ट्रवादी ४ रिपब्लिकन पार्टी १ असे पक्षीय बलाबल आहे सध्याच्या महाविकास आघाडीचा प्रयोग उल्हासनगरमध्ये झाल्यास निवडणूक लढवणे सोपी होऊ शकेल अन्यथा भाजपला पुन्हा सत्ता प्राप्त करण्यास अडचण असणार नाही.

**सारांश**

महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे सन २०१९ पासून बदलली असून परस्पर विरोधी विचारसरणी असलेले शिवसेना राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांचे सरकार सध्या महाराष्ट्र राज्यात सत्तारूढ झाले आहेत या बदलत्या राजकीय प्रयोगाचा परिणाम आगामी महानगर पालिका निवडणुकीत कसा होतोय हे पहाणे एक सर्वसाधारण साधारण नागरिक या नात्याने औत्सुक्याचे ठरेल. सदर संशोधन लेखातून सध्याची राजकीय व पक्षीय बलाबल तेथील राजकीय परिस्थिती याचा प्रामाणिकपणे अभ्यास करून वस्तुनिष्ठ निष्कर्ष मांडण्याचे कार्य केले आहे.

**संदर्भ**

१.इंडियन पॉलिटी, एम.लक्ष्मीकांत, श्रीकांत गोखले (मराठी अनुवाद) के सागर प्रकाशन, पुणे 2017
२.दै लोकसत्ता, दै पुढारी, दै तरुण भारत, दै महाराष्ट्र टाइम्स,दै लोकमत.
३.बी.बी.सी मराठी वार्ता वाहिनी.
४.महाराष्ट्राचा भूगोल, ए.बी.सवदी,निराली प्रकाशन पुणे 2018